स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते


**महाराष्ट्र शासन**

प्राथमिक शिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१

दूरध्वनी क्र.: ०२०-२६१२४५७२ ई-मेल : depmah2@gmail.com


क्र.प्राशिसं/प्राथ./आधार/संच मान्यता/४३०५/२०२३/

दि. 07 JUN 2023

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)

जिल्हा परिषदा (सर्व )

शिक्षण निरिक्षक,बृहन्मुंबई (सर्व )

(पश्चिम/उत्तर/दक्षिण )

**विषय :- शाळेतील दिनांक ३०/११/२०२२ रोजी पटावर असलेल्या परंतु आधार अवैध ठरलेल्या विद्यार्थ्यांची पडताळणी करुन संच मान्यतेसाठी विचारात घेण्याबाबत.**

संदर्भ :- १.शासन निर्णय दिनांक ०६/०२/२०२३ व शासन पत्र दिनांक २३/११/२०२२

२.मा.मंत्री,शालेय शिक्षण यांच्या समवेत दिनांक २६/०५/२०२३ रोजी झालेली बैठक

सरल प्रणालींतर्गत राज्यातील प्राथमिक,माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑनलाईन पध्दतीने एनआयसी,पुणे यांच्या मार्फत करण्यात येतात. त्यानुसार संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ०६/०२/२०२३ शासन पत्र दिनांक २३/११/२०२२ मधील तरतुदीनुसार दिनांक ३०/११/२०२२ रोजी स्टुडंट पोर्टलवर असलेल्या विद्यार्थ्यापैकी दिनांक १५/०६/२०२३ अखेर आधार वैध असलेली विद्यार्थी संख्या विचारात घेवून सन २०२२-२३ ची संच मान्यता अंतिम करण्यात येणार आहे.

सध्यस्थितीत किमान ८० टकके विद्यार्थी वैध विचारात घेवून अंतरिम संच मान्यता करण्यात आलेल्या आहेत, शाळांकडून विद्यार्थी वैध करण्याची कार्यवाही योग्य प्रकारे सुरु आहे. परंतु विद्यार्थ्याच्या नावातील तफावतीमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव विद्यार्थी अवैध ठरत असतील अथवा कांही विद्यार्थ्याकडे आधार कार्ड उपलब्ध नसतील व या विद्यार्थ्यामुळे शाळेतील सन २०२२-२३ च्या मंजुर पदावर विपरित परिणाम होत असेल तर **अशा शाळा तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे या प्रकारच्या विद्यार्थ्याच्या नावाच्या यादीसह अर्ज करतील** व शाळांच्या बाबतीत संबंधित गटशिक्षणाधिकारी हे अशा विद्यार्थ्यापैकी जे विद्यार्थी वर्गात नियमित उपस्थित असतील तर अशा विद्यार्थ्यांची शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यांच्याकडून याबाबतची योग्य ती खात्री करतील व त्यांच्या पडताळणीमध्ये नियमित असलेले विद्यार्थी संच मान्यतेसाठी विचारात घेतले जातील. विद्यार्थ्याची पडताळणी करताना खालील बाबीची खात्री करावी.(प्रमाणपत्र,पडताळणी प्रपत्र १ ते ३ सोबत जोडले आहे.)

१. नाव,लिंग किंवा जन्मतारीख जुळत नसलेल्या विद्यार्थ्याच्या बाबतीत अशा विद्यार्थ्यांची शाळेत असलेली नोंद व विद्यार्थ्याची प्रत्यक्ष शाळेत उपस्थित असल्याची खात्री करुन व सदर विद्यार्थी जवळपासच्या अन्य शाळांमध्ये दाखवले गेले नाहीत याची शाहनिशा करुन असे विद्यार्थी संबंधित शाळेच्या संच मान्यतेकरीता ग्राहय धरण्यात यावेत.

२. ज्या विद्यार्थ्याची आधार क्रमांकासाठी नोंद केली आहे अथवा आधार कार्ड उपलब्ध नाहीत असे विद्यार्थी संबंधित शाळेत नियमित येत असल्याची व सदर विद्यार्थी जवळपासच्या अन्य शाळांमध्ये दाखल केले नाहीत याची तसेच त्यांचे आधार कार्ड का तयार होवू शकले नाहीत याची शहानिशा करुन असे विद्यार्थी संच मान्यतेत ग्राहय धरण्यात यावेत.

३. शाळेतील विद्यार्थी डुप्लिकेट (Duplicate) असल्याचे स्टुंडट पोर्टलवर दर्शवित असेल तर असा विद्यार्थी नेमका कोणत्या शाळेत शिकत आहे याची क्षेत्रीय यंत्रणेकरुन खात्री करुन योग्य त्या शाळेत सदर विद्यार्थ्याची नोंद करावा.

४. शाळेकडून अर्ज प्राप्त झालेल्या प्रत्येक शाळेत संबंधित शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्र प्रमुख यांनी समक्ष भेट देवून अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती तपासण्यात यावी व मुख्याध्यापकांनी अर्ज केलेला प्रत्येक विद्यार्थी संच मान्यतेत धरण्यासाठी पात्र आहे किंवा नाही याची खात्री करावी.

५. ज्या शाळांची किमान **९० टक्के विद्यार्थी** शाळांनी वैध केलेले आहेत त्याच शाळांतील उर्वरित विद्यार्थ्यांबाबतची त्यांच्या अडचणी लक्षात घेवून पडताळणी करण्यात यावी.

६. आधार इनव्हॅलीड/अनप्रोसेसड/आधार क्रमांक नसलेले विद्यार्थी शाळेत नियमित येत असल्याचे विविध बाबी लक्षात घेवून खात्री पटल्यानंतरच त्यास संच मान्यतेसाठी ग्राहय धरण्यात यावे.

आवश्यक ती पडताळणी केल्यानंतर संबंधित शाळेच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगीनवर सदर विद्यार्थ्यांना संच मान्यतेसाठी विचारात घेण्याबाबत योग्य ती सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल अथवा सदर अहवालाच्या आधारे सदर विद्यार्थ्यांना विचारात घेवून संच मान्यता सन २०२२-२३ करण्यात येतील.

वर नमुद केल्यानुसार शालेय विद्यार्थ्यांपैकी ज्यांचे आधार अवैध ठरलेल्या व आधार कार्ड नसलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत योग्य ती खात्री करुन पढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(शरद गोसावी)**
शिक्षण संचालक
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म.रा.पुणे-१

**(संपत सूर्यवंशी)**
शिक्षण संचालक
माध्यमिक व उच्च माध्यमिक
म.रा.पुणे-१

**प्रतिलिपी सविनय सादर**
मा.प्रधान सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना सविनय सादर
मा.आयुक्त,शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना सविनय सादर
विभागीय शिक्षण उपसंचालक,सर्व विभाग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

# प्रमाणपत्र

आम्ही खाली स्वाक्षरी करणारे प्रमाणित करतो की, शाळेचे नांव---------------------- ----------------- केंद्र-------------- तालुका-------------- जिल्हा----------- युडायस क्रमाक-------------------- या शाळेस दिनांक ------------------समक्ष भेट दिली असता आधार क्रमांक नसलेले/आधार क्रमांक इनव्हलीड ठरलेले/अनप्रोसेसड असलेले विद्यार्थी शाळेत उपस्थित असल्याची आम्ही खात्री केली असून सदरचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | तपशिल | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| १ | दि.३०/११/२०२२ रोजीची पटसंख्या (स्टुडंट पोर्टलनुसार) | |
| २ | आधार क्रमांक व्हॅलीड संख्या | |
| ३ | आधार क्रमांक ईनव्हॅलीड विद्यार्थी संख्या | |
| ४ | आधार क्रमांक अनप्रोसेसड विद्यार्थी संख्या | |
| ५ | आधार क्रमांक नसणारे विद्यार्थी संख्या | |
| ६ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित येणारे विद्याथी संख्या | |
| ७ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित न येणारे विद्याथी संख्या | |
| ८ | रकाना २ व ६ नुसार एकुण संच मान्यतेसाठी पात्र विद्यार्थी संख्या | |

तरी एकूण ----- (एकूण अक्षरी-------------------------------------) विद्यार्थी संच मान्यतेसाठी ग्राहय धरण्यात यावेत.केंद्रांतर्गत शाळेमध्ये दुबार नोंद नसल्याची खात्री करण्यात आली आहे. सदरील विद्यार्थी संख्या चुकीची आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची राहील व होणाऱ्या कारवाईसाठी आम्ही पात्र राहील.

१. संबंधित बिटचे विस्तार अधिकारी स्वाक्षरी

२. संबंधित केंद्र शाळेचे केंद्र प्रमुख स्वाक्षरी

**सन २०२२-२३**

**विद्यार्थी पडताळणी प्रपत्र- २**

शाळेचे नांव :

युडायस क्रमांक :

पडताळणी दिनांक :

| अ क्र | तपशिल | विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | इ.१ ली | इ. २ री | इ.३ री | इ.४ थी | इ.५ वी | इ.६ वी | इ.७ वी | इ.८ वी | इ.९ वी | इ.१० वी | इ.११ वी | इ. १२ वी | एकुण |
| १ | दि.३०/११/२०२२ रोजीची पटसंख्या (स्टुडंट पोर्टलनुसार) | | | | | | | | | | | | | |
| २ | आधार क्रमांक व्हॅलीड संख्या | | | | | | | | | | | | | |
| ३ | आधार क्रमांक ईनव्हॅलीड विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | | |
| ४ | आधार क्रमांक अनप्रोसेसड विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | | |
| ५ | आधार क्रमांक नसणारे विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | | |
| ६ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित येणारे विद्याथी संख्या | | | | | | | | | | | | | |
| ७ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित न येणारे विद्याथी संख्या | | | | | | | | | | | | | |
| ८ | रकाना २ व ६ नुसार एकुण संच मान्यतेसाठी पात्र विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | | | |

१ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी

२ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी

| सन २०२२-२३ | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **विद्यार्थी पडताळणी प्रपत्र क्रमांक-१** | | | | | | | | |
| शाळेचे नांव : | | | | | | | | |
| युडायस क्रमांक : | | | | | | | | |
| पडताळणी दिनांक : | | | | | | | | |
| Sr No | Student ID | Student Name | Date of Birth | Sex | Class | Division | Eligible for Sanch Manyata YES/NO | आधार वैध न होण्याचे कारण |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

१ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी

२ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी

| सन २०२२-२३ | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **विद्यार्थी पडताळणी प्रपत्र -३** | | | | | | | | | | | | |
| शाळेचे नांव : | | | | | | | | | | | | |
| युडायस क्रमांक : | | | | | | | | | | | | |
| पडताळणी दिनांक : | | | | | | | | | | | | |
| अ क्र | तपशिल | **विद्यार्थी संख्या** | | | | | | | | | | |
| | | इ.११ वी | | | | | इ.१२ वी | | | | | एकुण |
| | | कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त | एकुण | कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त | एकुण | |
| १ | दि.३०/११/२०२२ रोजीची पटसंख्या (स्टुडंट पोर्टलनुसार) | | | | | | | | | | | |
| २ | आधार क्रमांक व्हॅलीड संख्या | | | | | | | | | | | |
| ३ | आधार क्रमांक ईनव्हॅलीड विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | |
| ४ | आधार क्रमांक अनप्रोसेसड विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | |
| ५ | आधार क्रमांक नसणारे विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | |
| ६ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित येणारे विद्याथी संख्या | | | | | | | | | | | |
| ७ | रकाना ३ ते ५ पैकी नियमित न येणारे विद्याथी संख्या | | | | | | | | | | | |
| ८ | रकाना २ व ६ नुसार एकुण संच मान्यतेसाठी पात्र विद्यार्थी संख्या | | | | | | | | | | | |

१ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी

२ तपासणी अधिकाऱ्यांचे नाव,पदनाव व स्वाक्षरी